दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजश भांगे
बीड/महाराष्ट्र • सोमवार दि.१० फेब्रुवारी २०२५ • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष २ रे • अंक-११५ • पाने ४ • किंमत ४ रुपये

## स्वामींच्या कृपेने माझ्यावर पर्यावरण खात्याची जबाबदारी

**नाशिक**–स्वामींच्या कृपेने मला पर्यावरण खात्याची जबाबदारी मिळाली. मी श्रद्धाळू आहे, पण अंधश्रद्धाळू अजिबात नाही. गणपती दूध पितो असल्या अंधश्रद्धांवर माझा विश्वास नाही. आपण विज्ञानाशी सांगड घातली पाहिजे, असे पंकजा मुंडे म्हणाल्या. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी आज दिंडोरी येथील अण्णासाहेब मोरे म्हणजे गुरु माऊली यांच्या आश्रमाला भेट दिली असता त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी बोलताना नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभवरही भाष्य केले.आज नाशिक येथील स्वामी समर्थ केंद्र प्रणीत जागतिक कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला पंकजा मुंडे यांनी हजेरी लावली. पंकजा मुंडे यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावल्याने अनेक तर्क वितर्क लावले जात आहेत. कारण सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड आणि विष्णू चाटे फरार असताना दिंडोरी येथील स्वामी समर्थ केंद्रात गेल्याचा आरोप भूमाता ब्रिगेडच्या प्रमुख आणि सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी केला होता. त्यातच आज पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे नाशिकच्या दौऱ्यावर असून स्वामी समर्थ केंडरच्या कार्यक्रमाला त्यांनी हजेरी लावली आहे.

## लाडकी बहीण योजनेत मोठी तपासणी


# अमरावतीत ७ लाख महिलांपैकी अपात्र लाभार्थ्यांची छाननी सुरू,आठवड्यात निकाल



**अमरावती (वृत्तसंस्था)**–अमरावती जिल्ह्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभार्थी महिलांच्या पात्रतेची व्यापक तपासणी सुरू करण्यात आली आहे. जिल्ह्यातील ७ लाख २० हजार ६३८ अर्जांपैकी ७ लाख ३ हजार ८४४ महिलांना आतापर्यंत पाच महिन्यांचे आर्थिक सहाय्य मिळाले आहे.
राज्य शासनाने निवडणुकीनंतर या योजनेची कडक समीक्षा सुरू केली असून, पात्रतेचे निकष पुन्हा एकदा तपासले जात आहेत. योजनेच्या नियमांनुसार, ज्या कुटुंबात चार चाकी वाहन आहे किंवा ज्या महिला सध्या महाराष्ट्राबाहेर वास्तव्यास आहेत, त्या या योजनेसाठी अपात्र ठरतील. जिल्हा परिषदेचे महिला व बालविकास योजनेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विलास मरसाळे यांनी अपात्र महिलांना स्वयंप्रेरणेने योजनेतून माघार घेण्याचे आवाहन केले आहे.महिला व बालविकास विभागाने स्पष्ट केले की, तपासणीदरम्यान अपात्र आढळलेल्या लाभार्थ्यांना पुढील लाभ मिळणार नाही. संपूर्ण पडताळणी प्रक्रिया पूर्ण होण्यास आणखी एक आठवडा लागण्याची शक्यता आहे. या तपासणीनंतर अपात्र लाभार्थ्यांची अंतिम संख्या स्पष्ट होईल.दरम्यान, राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी शुक्रवारी एका ट्विटद्वारे लाडकी बहीण योजनेतून ५ लाख महिलांना वगळण्यात आल्याची माहिती दिली. त्या आपल्या पोस्टमध्ये म्हणाल्या, दिनांक २८ जून २०२४ व दिनांक ३ जुलै २०२४ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार अपात्र ठरणाऱ्या महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात येत आहे. त्यानुसार संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थी असणाऱ्या २ लाख ३० हजार महिलांना या योजनेतून वगळण्यात आले आहे. तसेच वय वर्षे ६५ हून अधिक असणाऱ्या १ लाख १० हजार महिलांची नावेही या योजनेतून हटवण्यात आली आहेत.दुसरीकडे, या योजनेचा फेब्रुवारीचा हप्ता केव्हा मिळेल याविषयी महिला वर्गात चर्चा सुरू झाली आहे. जानेवारीचा हप्ता महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यानंतर मिळाला होता. त्यामुळे या महिन्यातही त्याच कालावधीत लाभ मिळण्याची शक्यता आहे. विशेषतः महायुती सरकारने निवडणुकीच्या प्रचारात या योजनेतील अर्थसहाय्याची रक्कम १५०० वरून २१०० करण्याची ग्वाही दिली होती. आता राज्याच्या अर्थसंकल्पात तशी एखादी तरतूद केली जाते काय? असा सवालही या प्रकरणी चर्चिला जात आहे.

## विनोद नंदनवार होणार विदर्भ भुषण पुरस्काराने सन्मानित

**जालना । असलम कुरेशी**



जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सुजातपूर ता. समुद्रपूर जि. वर्धा येथील विषय शिक्षक विनोद नंदनवार यांची वैदर्भिय नाथ चॅरिटेबल ट्रस्टच्या सामाजिक विभागाच्या वतीने दिला जाणारा विदर्भभुषण पुरस्कारासाठी निवड झाली आहे.
विनोद नंदनवार यांना प्राप्त निवड पत्रात म्हटले आहे की आपल्या उल्लेखनिय कार्याची दखल घेऊन आपली निवड वैदर्भिय नाथ चॅरिटेबल ट्रस्टच्या सामाजिक विभागाच्या वतीने विदर्भ भुषण पुरस्कारासाठी केलेली आहे. वैदर्भिय नाथ चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा स्थानिक महेश भवन कारंजा (लाड) जि. वाशिम येथे २३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता मंत्री महोदय तथा आमदार यांच्या उपस्थितीत आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यामध्ये विनोद नंदनवार यांना आकर्षक सन्मानचिन्ह, मेडल, सन्मानपत्र, मानाचा फेटा व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. विनोद नंदनवार यांना विदर्भ भुषण पुरस्कार जाहिर झाल्याबद्दल त्यांच्यावर विविध क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## स्वत:मध्ये सकारात्मक बदल घडवून युवकांनो जग जिंका–डॉ.इंगोलें

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई युवकांनी सतत स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवून आणत स्वतःला 'ट्रान्सफॉर्ममेशन ' प्रक्रियेत ठेवले पाहिजे तरच त्यांच्या व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल घडून येऊन ते जीवनात आपल्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करीत ते ध्येय मिळवू शकतात, जग जिंकू शकतात असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा इंडीयन मेडीकल असोसिएशनचे सांस्कृतिक राज्य प्रमुख डॉ. राजेश इंगोले यांनी केले.



योगेश्वरी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या समारोप प्रसंगी ते प्रमुख व्याख्याता म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे सचिव कमलाकरराव चौसाळकर, संचालक अंगदराव कराड, प्राचार्य एम.व्ही. कानेटकर, उपप्राचार्य आर.व्ही. कुलकर्णी, प्रा. मेजर एस.पी.कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते महापुरूषांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ. राजेश इंगोले यांनी, युवा वर्गानि आपल्या व्यक्तित्व आणि व्यक्तिमत्व या दोन गोष्टींकडे विशेषत्वाने लक्ष दिले पाहिजे असे सांगून या गोष्टीं जीवनामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत असे सांगितले. स्वतःमध्ये बदल करीत राहणे ही एक निरंतर प्रक्रिया आहे. त्यामुळे प्रत्येक चांगली गोष्ट आत्मसात करून आपल्या व्यक्तिमत्त्वांमध्ये त्या गोष्टीचा समावेश करणे म्हणजेच स्वतःमध्ये ट्रान्सफॉर्मेशन करणे आहे. हे ट्रान्सफॉर्मेशन एका रात्रीत होत नसते तर त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात.

## कोणाचा साला कोणाचा नातेवाईक हे बघून कारवाई नसते– देवेंद्र फडणवीस

**मुंबई**–मनोज जरांगे पाटील यांच्या मेहुण्यावर जालना पोलिसांनी तडीपारची कारवाई केली आहे. जालना जिल्ह्यात ९ वाळू माफियांविरोधात पोलिसांनी तडीपारीची कारवाई केली आहे. यात मनोज जरांगे यांचा मेहुणा देखील आहे. विलास खेडकर असे त्याचे नाव आहे. यावर बोलताना मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरच टीका केली होती. आता यावर देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कोणाचा साला आहे, कोणाचा नातेवाईक आहे, याच्यावर कारवाई होत नसते. जर काही गुन्हे केले असतील तर अटक होत असते. या प्रकरणाची माझ्याकडे माहिती नाही, योग्य ती माहिती घेऊन मी तुम्हाला सांगेन, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.दरम्यान मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्र्यांवर टीका केली आहे. ते म्हणाले, एकीकडून सुरेश धस आणि देवेंद्र फडणवीस सांगतात की, आम्ही मराठा आंदोलकांच्या केसेस मागे घेणार आहोत आणि दुसरीकडे मराठा आंदोलकांना नोटीस दिल्या जात आहेत. तुमचा दुसरा काही विषय असेल तर आम्हाला देणे घेणे नाही, आपली भूमिका कायम आहे. आमच्या सरळ स्वभावाचा फायदा तुम्ही उचलायचा नाही. तुम्ही अंतरवालीतील आंदोलकांना जर नोटीस देणार असाल, तुम्ही त्यांच्या पाठीमागे असे लागणार असेल तर फडणवीस साहेब मी सोडणार नाही.

## मॉडर्न इंटरनॅशनल स्कूल गंगापूर येथे पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा यशस्वीरीत्या संपन्न

**गंगापूर । प्रा.संजय तुपे**

मॉडर्न इंटरनॅशनल स्कूल (उइडए), गंगापूर येथे आज पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी) शिष्यवृत्ती परीक्षा अत्यंत नियोजनबद्ध आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. या परीक्षा केंद्रात एकूण २४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.या परीक्षेचे समन्वयक श्री. सोनवणे सर होते. तसेच, परीक्षेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा संजय तुपे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांनी परीक्षा व्यवस्थापन आणि विद्यार्थ्यांसाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.
शाळेच्या प्रशासनाने परीक्षेसाठी उत्तम नियोजन केले होते. परीक्षेच्या पारदर्शकतेची आणि शिस्तबद्धतेची पालकांनीही प्रशंसा केली. परीक्षा केंद्रावर शिस्त व सुव्यवस्थेचे काटेकोर पालन करण्यात आले.



या परीक्षेच्या आयोजनासाठी गटशिक्षणाधिकारी समाधान अराख, केंद्र प्रमुख लक्ष्मण उबाळे, शाळेच्या अध्यक्षा श्रीमती बिंदू विश्वभंरम समन्वयक, मुख्याध्यापिका कविता गवते,समन्वयक प्रा संजय तुपे,एम बी मुळे, शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

## हनुमान मंदिर गांगलेगाव येथील ५१व्या अखंड विणा वर्धापन दिना निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम

**नांदेड । हनुमंत चंदनकर**

बिलोली तालुक्यातील गांगलेगाव येथील नवसाला पावणाऱ्या हनुमान मंदीरावर ५१ वर्षापासून अखंड चालत असलेल्या विण्याला आज दिनांक १०/०२/२०२५ रोज सोमवारी एकावन्न वर्ष पूर्ण होत असल्याने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे सकाळी१० वाजता नविन विणा दुपारी १२ वाजता भव्य महाप्रसाद, सायंकाळी ४ वाजता जुन्या विण्याची गावभर मिरवणूक व रात्री ८:३० ते ११ हरि किर्तन किर्तनकार ह भ प श्री संतोष महाराज कुशावाडीकर मृदंग वादक विठ्ठल महाराज आळंदीकर, गेली आर्धे शतकापासून गांगलेगाव ग्रामस्थाच्या वतीने अखंड राम कृष्ण हरी नामाचा गजर करत अखंड विणा पारा चालू ठेवला आहे यासोबतच वर्षभर मंदिर विविध धार्मिक कार्यक्रम चालू राहतात मारोतीच्या दर्शनासाठी तेलंगणा, कर्नाटक, महाराष्ट्र



सह अनेक राज्यांतील भाविक वर्षभर येत राहतात जागृत देवस्थान म्हणूनही ओळखले आहे

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत रमाई यांची जयंती साजरी

**केज । प्रतिनिधी**

दि.७ फेब्रुवारी २०२५ शुक्रवार रोजी त्यागमूर्ती रमाई आंबेडकर यांच्या जयंती निमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व राष्ट्रीय विज्ञान दिन विशेष या निमित्ताने दैनंदिन कार्यक्रम राबविण्यात येत असलेल्याने ब्रम्हगुप्त या गणिती व ज्योतिषशास्त्रज्ञ यांच्या प्रतिमेचे शाळा व्यवस्थापनसमितीअध्यक्ष संपत्ती सरवदे व उपाध्यक्ष सीमा मोहिते तसेचजिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ कदम यांनी पूजन करुन अभिवादन करण्यात आले.त्यागमूर्ती व बलिदानाची मूर्ती रमाई आंबेडकर यांचा जन्म वणंदगाव येथे दि.७ फेब्रुवारी १८९८ रोजी झाला.आई रुक्मिणी व भिकु धोत्रे हे वडील होते. त्यांचे लग्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी झाले त्यांनी आपल्या पतीच्या कार्यात भक्कम साथ दिली.दि.१ फेब्रुवारी २०२५ ते दि.२८फेब्रुवारी २०२५ या कालावधीत राष्ट्रीय विज्ञानदिन विशेष साजरा करण्यात येत असलेल्याने ब्रम्हगुप्त या गणिती व ज्योतिषशास्त्रज्ञ यांचीही माहिती दिली. ब्रम्हगुप्त हे भारतीय गणिती व ज्योतिषशास्त्रज्ञ होते.ते




मारवाडातील भिनमाळ गावचे रहिवासी होते.ते इ.स.५९८ ते ६६५ या कालावधीत म्हणजे ७ व्या शतकातील गणित व ज्योतिषशास्त्रज्ञ होते. अशी माहिती श्री. राजाभाऊ कदम अपग्रेड मुख्याध्यापक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी यांनीदिली. श्रध्दा सरवदे,प्रियंका देटे, प्रणव कांबळे,श्वेतासरवदे, मानसी सरवदे या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या शाळेतील शिक्षक श्री. भारत हांगे,बाळासाहेब राठोड,श्रीमती गिताताई अंडील,श्रीमती सोनाली भुमकर यांनी सविस्तर माहिती दिली.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन इ.७ वी ची विद्यार्थिनी श्रध्दा सरवदे यांनी केले तर आभार प्रियंका देटे यांनी मानले.

## ना.पंकजाताई मुंडेंच्या आदेशानंतर अधिकाऱ्यांनी केली परळीच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेची पाहणी

### परळीच्या मेरूगिरी डोंगरासह, लोणी, लोणारवाडी येथील जागांना दिल्या भेटी

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या आदेशानंतर पशुवैद्यकीय विज्ञान विद्यापीठाच्या तसेच महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आज परळीत होत असलेल्या प्रस्तावित पशुवैद्यकीय महाविद्यालयांसाठी विविध ठिकाणी प्रत्यक्ष भेटून जागेची पाहणी केली.
पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी परळीत पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याकरिता विभागाला नुकतेच आदेशित केले होते. महाविद्यालय स्थापन करण्याकरिता मुलभूत सोयीसुविधांचे निरीक्षण व भारतीय पशू चिकित्सा परिषद नवी दिल्ली यांचे मानकानुसार आवश्यक असलेल्या बाबींच्या अनुषंगाने विद्यापीठ



स्तरिय निरीक्षण समिती गठीत करण्यात आली असून या समितीचे अध्यक्ष तथा पशू विज्ञान विद्यापीठाचे डीन डॉ. एस व्ही. उपाध्ये, डॉ. जी. एस. खांडेकर, कनिष्ठ अभियंता डॉ. पी.व्ही. तायडे, आरिफ शेख, तांत्रिक अधिकारी डॉ पी. इ. ताकसांडे यांच्यासह परळीचे उप जिल्हाधिकारी अरविंद लाठकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, पशुसंवर्धन सहायक आयुक्त डॉ. विजय कराड, उपायुक्त डॉ. आर डी कदम आदींनी आज तालुक्यातील लोणी, लोणारवाडी या गावांसह परळी शहरातील वैद्यनाथ मंदिराच्या परिसरात असलेल्या मेरूगिरी डोंगरावरील जागेची पाहणी केली. महाविद्यालयांसाठी लागणारी जमीन लोणी येथे १२ हेक्टर, लोणारवाडी येथे १८ हेक्टर आणि परळी शहराच्या मेरूगिरी डोंगरावर सुमारे २० हेक्टर जमीन उपलब्ध आहे, या सर्व ठिकाणी मुलभूत सोयी सुविधा देखील सहज उपलब्ध होऊ शकतील का? याचा देखील आढावा अधिकाऱ्यांनी घेतला. जागेच्या पाहणीचा अहवाल ना. पंकजाताई मुंडे यांना सादर केल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

## संपादकीय..

# तुमची आर्थिक समृद्धी रोखणाऱ्या सवयी

प्रत्येक व्यक्ती निश्चित हेतूने गुंतवणूक करीत असते. या हेतूमध्ये अनेकदा आपल्याला खरंखुरं आर्थिक स्वातंत्र्य मिळावं, खर्च करताना पैसे आपल्या मर्जीनुसार करता यावेत अशी त्यांची अपेक्षा असते. कोणतीही गुंतवणूक स्वतः न करता अनपेक्षितपणे काहीजण श्रीमंत बनतात. त्यांच्याकडे केवळ भरपूर पैसे आहेत म्हणून आपण त्यांना श्रीमंत असे म्हणू शकतो, समृद्ध नव्हे. असलेले पैसे योग्य रीतीने गुंतवणूक करून वाढवता आले किंवा त्यात भर घालता आली नाही तरी निदान ते सांभाळता येईल एवढे किमान कौशल्य आपल्याकडे असेल, तर आर्थिकदृष्ट्या आपण खरोखरच समृद्ध झालो असे म्हणता येईल. हा मार्ग वाटतो तितका सोपा नाही. त्यात अनेक अडथळे आहेत. आपल्या अनेक आर्थिक सवयी या आपल्याला मध्यमवर्गातच ठेवतात अथवा त्याकडे ढकलतात, त्यांचा थोडक्यात आढावा घेऊ या.

उदय पिंगळे

कोणतेही निश्चित आर्थिक ध्येय नसणे – अनेक व्यक्ती अशा आहेत त्यांच्यापुढे कोणतेही आर्थिक ध्येय नसते. त्यामुळे बचत किंवा त्यापुढे जाऊन गुंतवणूक करावी असे त्यांना वाटतच नसल्याने त्यांना समृद्धी सोडाच श्रीमंतही होता येत नाही. तेव्हा आर्थिक दृष्टीने समृद्ध व्हायचं असेल तर आपले उद्दिष्ट असणे आणि ते पूर्ण करण्याचे प्रामाणिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. स्वतःच्या आर्थिक उद्दिष्टांना प्राधान्य न देणे– काही व्यक्ती अशाही आहेत ज्यांच्याकडे निश्चित आर्थिक उद्दिष्ट आहे; परंतु त्यांचा प्राधान्यक्रम गरजा आणि चैन यासाठी खर्च करण्याकडे आहे. त्यामुळे ते पुरेशी गुंतवणूक करू शकत नाहीत, आर्थिकदृष्ट्या समृद्ध होऊ शकत नाहीत. फारच थोडे लोक उद्दिष्टांवर लक्ष ठेवून प्रथम बचत अथवा गुंतवणूक करतात. मिळालेल्या पैशाचे नियोजन करून गुंतवणूक केल्यास, राहिलेले पैसे परिस्थितीनुसार खर्च कसे करायचे ते आपोआप समजत जाईल.

अनावश्यक कर्ज घेणे – आर्थिक क्षेत्रातील स्पर्धेमुळे सध्या कुणालाही सहज कर्ज उपलब्ध होत आहे. त्यासाठी कोणतेही तारण ठेवावे लागत नसल्याने, अनेकदा अनावश्यक कारणांसाठी कर्ज घेतले जाते. स्वतःला राहण्यासाठी घर, उच्च शिक्षण, व्यवसायाची वृद्धी यासाठी घेतलेले कर्ज हे आवश्यक कर्ज म्हणता येईल. घर आणि उच्च शिक्षण हे गरजेचे; परंतु आता आवाक्यातील नसलेले त्यामुळे कर्ज घ्यावे लागणे अपरिहार्य आहे. व्यवसाय वृद्धीसाठी घेतलेल्या/ कर्जातून भविष्यात उलाढाल होईल, वाढीव परतावा मिळू शकतो म्हणून ते कर्ज आवश्यक कर्ज समजावे. याउलट चैनीच्या वस्तू खरेदी करण्यासाठी घेतलेले कर्ज अनावश्यक म्हणता येईल. अनेकदा यासाठी हप्ता (एचख) किती पडेल हे सांगितले जाते. त्याकडे पाहून कर्ज खूप क्षुल्लक वाटू शकते. यासाठी व्याज द्यावे लागते. वरचेवर सहज उपलब्ध असणारे कर्ज घेतल्यास कर्ज फेडण्यासाठी नवे कर्ज अशी परिस्थिती निर्माण होऊन तुमची वाटचाल दिवाळखोरीकडे सुरू होते. पुरेसा राखीव निधी नसणे – अचानक काही आर्थिक संकट आलं, जसे मोठे आजारपण, अपघात, नोकरी जाणे अशा परिस्थितीत काही नियमित खर्च हे करावेच लागतात. त्यांना पर्याय नसतो. स्वतःकडे ६ ते १२ महिने खर्चास पुरेल एवढा निधी असेल आणि तो सहज काढून घेता येत असेल तर तो उपयोगी पडतो. नाहीतर अधिक व्याजदराने कर्ज घ्यावे लागते. उधार उसनवारी करावी लागते. असा निधी निर्माण करून आपली आर्थिक स्थिती मजबूत राहते. कुणाकडे हात पसरावे

लागत नाहीत. उत्पन्न, खर्च, मालमत्ता, दायित्व किती ते माहिती नसणे – कोणतेही आर्थिक उद्दिष्ट नसलेल्या व्यक्तीना या गोष्टी माहिती नसतात. याचा वेळोवेळी आढावा घेऊन त्याप्रमाणे गुंतवणूक निर्णय घेण्याची सवय असल्यास त्यातील अनावश्यक गोष्टी टाळता येतात. आवश्यक तरतुदी/धोरणात्मक बदल करता येतात. आर्थिक नुकसान करणाऱ्या महाग सवयी – अपवादात्मक प्रसंगीच क्षम्य असलेल्या आणि अलीकडे सर्रास अंगवळणी पडलेल्या काही सवयी उदा. हॉटेलिंग करणे, तत्काळ कोट्यातून प्रवास तिकीट काढणे, शेवटच्या क्षणी सहलीस निघणे, आयत्या वेळी विमानाचे तिकीट काढणे, बाहेर खाणे, ब्रॅण्डेड वस्तूच खरेदी करणे, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करण्याऐवजी खासगी वाहतुकीचा वापर करणे, सुजाण ग्राहक हा नेहमी जागृत असायला हवा. त्याने योग्य दर्जा आणि वाजवी किंमत (स्वस्त नव्हे) यांचा स्वतः नियमित शोध घ्यावा आणि नियोजन करावे. अगदीच नाईलाज असेल तरच अन्य पर्याय आजमावेत.गुंतवणूक न करता केवळ त्यांच्या संधी शोधत बसणे – गुंतवणुकीचे अनेक पर्याय उपलब्ध असताना विशिष्ट पर्यायाची वाट पाहण्यासाठी अनेकजण आपले पैसे तसेच बचत खात्यात ठेवतात. त्यामुळे गुंतवणूक न होता नुकसानच होते. फार काळ पैसे तसेच गुंतवणूक न करता ठेवण्याऐवजी आपल्याकडे एकच पर्याय नसून अन्य पर्यायही माहिती असायला हवेत.

कर आकारणी सवलती संबंधित माहिती नसणे – भांडवल बाजाराशी संबंधित अनेक गुंतवणूक प्रकार आहेत, त्यावर करसूट आणि सवलतीच्या एकसमान दराने कर आकारणी होते. अनेकांना हे माहिती नसल्याने ते आपली गुंतवणूक अन्य प्रकारात करून त्यावर कर देतात. प्राथमिक आर्थिक विषयांची कमी माहिती – आर्थिक संबंधात अशा अनेक प्राथमिक गोष्टी म्हणजे उद्दिष्ट, अंदाजपत्रक, देखभाल खर्च माहीत असतील तर योग्य पर्याय गुंतवणूकदार निवडू शकतात. उदा. घर, गाडी विकत घेणे याऐवजी भाड्याने घेणे. असलेले घर/ गाडी बदलून मोठे घर, आलिशान गाडी घेण्याचे फायदे / तोटे हे माहीत असेल तर योग्य तोच खर्च केला जातो. सहज सुचलेल्या या यादीत अनेक गोष्टींची अजूनही भर टाकता येईल. बऱ्याच जणांना त्या कंजूषपणा दर्शविणाऱ्या वाटतील. आवश्यक असेल तर त्या नक्की कराव्यात त्यासाठी मागे-पुढे पाहू नये. हा समतोल साधत राहिल्यासच आपण सुजाण गुंतवणूकदार बनून आपल्या संपत्तीत भर घालू शकतो.

# शंभर कोटी मुले हवामानबदलाच्या विळख्यात



जगभरातील शंभर कोटींहून अधिक, विशेषत: भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान, सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिक आणि नायजेरिया अशा कमी विकसित देशांमध्ये राहणाऱ्या मुलांना हवामानबदलामुळे वाढत्या धोक्यांचा सामना करावा लागतो. त्यांना आधीच स्वच्छ पाण्याची अनुपलब्धता, शिक्षणाचा अभाव, आरोग्यसेवांची कमतरता अशा समस्यांचा सामना करावा लागतो. त्याबरोबर आता या धोक्याचा सामना करावा लागत आहे.

'युनायटेड नेशन्स चिल्ड्रेन्स फंड' (युनिसेफ)ने नुकताच एक अहवाल प्रसिद्ध केला. त्यात येत्या काही वर्षांमध्ये मुलांच्या दृष्टीने पर्यावरणाच्या वाढत्या धोक्यांबद्दल गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली. या अहवालानुसार, येत्या काही दशकांमध्ये म्हणजे २०५० पर्यंत मुलांना उष्णतेच्या लाटा, पूर आणि जंगलातील आगीसारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागणार आहे. अहवालानुसार २०५० च्या पिढीला आताच्या तुलनेत जास्त उष्णतेचा सामना करावा लागू शकतो. अभ्यासानुसार, २०५० पर्यंत जगातील तापमान आताच्या जवळपास आठपट वाढू शकते. याचा अर्थ असा आहे की, मुलांना अधिक तीव्र उष्णतेचा सामना करावा लागेल. 'युनिसेफ'च्या अहवालानुसार येत्या काही वर्षांमध्ये उष्णतेमुळे जंगलात आग लागण्याचा धोका वाढणार आहे. वातावरणातील बदलामुळे, वाढलेली उष्णता-पूर-दुष्काळ यामुळे मुलांच्या भवितव्यासाठी मोठी आव्हाने निर्माण होऊ शकतात. 'युनिसेफ'च्या ताज्या अहवालात म्हटले आहे की, हवामानबदलाच्या धोक्याचा सामना करणाऱ्या या मुलांसाठी तातडीने आणि प्रभावी पावले उचलण्याची गरज आहे.जगातील कोट्यवधी मुले सध्या मोठ्या धोक्याच्या छायेखाली आहेत. हवामानबदलामुळे मोठा विध्वंस होऊ शकतो. जगातील ३३ देशांमध्ये येणारा काळ मुलांसाठी सर्वात धोकादायक असू शकतो. हवामान बदल आणि पर्यावरणीय समस्यांचा या देशांवर सर्वाधिक परिणाम होऊ शकतो. आश्चर्याची बाब म्हणजे जगातील हरितगृह वायूंच्या उत्सर्जनात यादीत समाविष्ट असलेल्या या देशांचे योगदान फारच कमी आहे. यादीत समाविष्ट असलेले हे ३३ देश, ज्यात भारताचाही समावेश आहे, एकत्रितपणे केवळ नऊ टक्के वायू उत्सर्जित करत आहेत. असे असूनही, या देशांमधील मुलांना उष्णतेच्या लाटा, पूर, दुष्काळ आणि इतर नैसर्गिक आपत्तींसारख्या वातावरणातील बदलांमुळे सर्वाधिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या समस्येमध्ये सर्वात जास्त सहभाग असलेले देश सुमारे ७० टक्के वायू उत्सर्जनासाठी जबाबदार आहेत. यापैकी फक्त एका देशाला मुलांसाठी सर्वाधिक धोका असलेल्या देशांमध्ये स्थान देण्यात आले आहे.

'चिल्ड्रेन क्लायमेट रिस्क इंडेक्स'नुसार, मध्य आफ्रिकन रिपब्लिकला ८.७ गुणांसह मुलांसाठी हवामानबदलाचा सर्वाधिक धोका असलेला देश म्हणून स्थान देण्यात आले आहे. यानंतर नायजेरिया आणि चाड ८.५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहेत. भारत ७.४ गुणांसह २६ व्या स्थानी आहे. पाकिस्तान (७.७ गुण) आणि अफगाणिस्तान, बांगलादेश, इथियोपिया ७.६ गुणांसह चौदाव्या आणि पंधराव्या स्थानी आहेत. लिंचेस्टीन हा युरोपियन देश २.२ गुणांसह मुलांसाठी हवामान बदलापासून सर्वात सुरक्षित देश मानला गेला असून या यादीत शेवटच्या म्हणजेच १५३ व्या क्रमांकावर आहे. युनिसेफ ही एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे, जी मुले आणि मातांच्या हक्कांचे आणि कल्याणाचे रक्षण करण्यासाठी कार्यरत आहे. हा संयुक्त राष्ट्रांचा एक भाग आहे. १९४६ मध्ये विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतर जगभरातील मुलांना, भेडसावणाऱ्या समस्या लक्षात घेऊन त्याची स्थापना करण्यात आली. जगातील मुलांचे जीवनमान सुधारणे हे 'युनिसेफ'चे उद्दिष्ट आहे.

'युनिसेफ' मुलांसाठी आरोग्य सेवा, लसीकरण, शुद्ध पाणी, पोषण आणि शिक्षण यांसारख्या आवश्यक मूलभूत सेवा पुरवते. याव्यतिरिक्त ती हिंसा, शोषण आणि भेदभाव दूर करण्यासाठी कार्य करते. गरिबी, युद्ध किंवा इतर आपत्कालीन परिस्थितींचा मुलांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या देशांमध्ये ही संस्था विशेष सक्रिय आहे. जगातील सर्वात लहान बेट राष्ट्र असलेल्या नाउरूमध्ये हरितगृह वायूंचे उत्सर्जन अत्यंत कमी आहे. आकाराने खूप लहान असलेल्या या देशाची लोकसंख्या खूपच कमी आहे. त्यामुळे त्याचे एकूण उत्सर्जन खूप कमी आहे. तुवालू या देशात हरितगृह वायू उत्सर्जन खूप कमी आहे. याचे मुख्य कारण म्हणजे त्याचा लहान आकार आणि मर्यादित औद्योगिकीकरण. भूतानमध्ये हरितगृह वायूंचे उत्सर्जन खूपच कमी आहे. याचे कारण तेथे अधिक जंगले आणि वनक्षेत्रे आहेत. ती कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात. माली हा पश्चिम आफ्रिकेतील एक अतिशय कमी औद्योगिकीकरण असलेला देश. तिथे हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी आहे. वातावरणातील बदलामुळे मुलांना पूर, उष्णतेची लाट, दुष्काळ अशा आपत्तींचा धोका तर वाढतोच; पण त्यांच्या आहारातील पोषक घटकही कमी होत आहेत. 'द स्टेट ऑफ द वर्ल्डस चिल्ड्रन' या अहवालानुसार हवामान-संबंधित आपत्ती, लोकसंख्येतील बदल आणि तंत्रज्ञानाच्या प्रवेशातील असमानता ही आजची मोठी आव्हाने आहेत.

२०२३ हे हवामान इतिहासातील आतापर्यंतचे सर्वात उष्ण वर्ष होते. यंदा जागतिक तापमानातील वाढ दीड अंश सेल्सिअसची लक्ष्मणरेषा ओलांडण्याची शक्यताही वर्तवली जात आहे. अशा परिस्थितीमध्ये हवामानाच्या वाढत्या धोक्यांचा परिणाम लहान मुलांवर अधिक गंभीरपणे होण्याची भीती या अहवालात व्यक्त करण्यात आली. पूर्व आणि दक्षिण आशिया तसेच पॅसिफिक, मध्य पूर्व, उत्तर, पश्चिम आणि मध्य आफ्रिकेतील देशांमध्ये अतिउष्णतेचा सामना करणाऱ्या मुलांच्या संख्येत सर्वात मोठी वाढ होऊ शकते, असे अहवालात म्हटले आहे. पुरामुळे पूर्व आफ्रिका आणि पॅसिफिक प्रदेशातील मुलांना सर्वात जास्त फटका बसण्याची शक्यता आहे. या संदर्भात 'युनिसेफ'च्या कार्यकारी संचालक कॅथरीन रसेल यांनी म्हटले आहे की, मुलांना हवामान आपत्तींपासून ऑनलाइन धोक्यांपर्यंत विविध प्रकारच्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. हे धोके काळाच्या ओघात अधिक गंभीर होतील. २०५० मध्ये चांगले भविष्य घडवण्यासाठी कल्पनेपेक्षा जास्त प्रयत्न करावे लागतील. या अहवालात लोकसंख्येमध्ये होणाऱ्या नाट्यमय बदलांवरही प्रकाश टाकण्यात आला आहे. यानुसार पुढील २६ वर्षांमध्ये उप-सहारा आफ्रिका आणि दक्षिण आशियामध्ये मुलांची लोकसंख्या सर्वाधिक असेल; आफ्रिकेत मुलांची संख्या सर्वाधिक असूनही ही लोकसंख्या ४० टक्क्यांच्या खाली पोहोचू शकते. २०००च्या दशकात लोकसंख्येतील हा हिस्सा सुमारे ५० टक्के होता. त्याचप्रमाणे, पूर्व आशियामध्ये २००० मध्ये असणारा २९ टक्के वाटा आता १७ टक्क्यांच्या खाली जाईल. पश्चिम युरोपमध्येही असेच काहीसे चित्र पाहायला मिळेल. या बदलांमुळे जगासमोर नवी आव्हानेही निर्माण होतील.

# बनवाट औषधांमुळे उपचार रामभरोसे

देवाचा प्रसाद ग्रहण करत असताना अगदी भक्तीभावाने घेतला जातो. तसेच डोळे बंद करून विश्वासाने गोळ्या औषधेही खाण्यात येतात. देवाच्या प्रसादावर जेवढा विश्वास ठेवण्यात येतो, तेवढाच विश्वास डॉक्टरांनी दिलेल्या गोळ्यांवर ठेवला जातो; परंतु जर गोळ्या-औषधच बनावट असतील, तर किंवा त्यामुळेच जीवाला धोका आहे, असे समजल्यावर त्या माणसांची काय अवस्था होईल? याचा नुसता विचार जरी केला तरी जिवाचा थरकाप उडतो. मराठवाड्यातील बीड, नांदेड, धाराशिव व छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात बनावट औषधांचा पुरवठा झाल्याचे उघडकीस आले आहे. मराठवाड्यातील शासकीय रुग्णालयात बनावट औषधी व गोळ्यांचा पुरवठा करून रुग्णांसाठी त्याचा वापरही झाल्याचे उघडकीस आले आहे.

नांदेडच्या जिल्हा शासकीय रुग्णालयातून मे २०२३ मध्ये न्यूक्लास ६२५ या गोळ्यांचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्या गोळ्यांचा अहवाल ऑक्टोबर २०२४ मध्ये प्राप्त झाला. त्यानंतर अन्न व औषध प्रशासन विभागाने १ लाख २३ हजार गोळ्यांचा साठा जप्त केला. दीड महिन्यापेक्षा अधिकचा काळ उलटूनही संबंधित कंपनीविरुद्ध कुठलाही गुन्हा दाखल करण्यात आला नाही. विशेष म्हणजे ज्या कंपनीने हा पुरवठा केला होता ती कंपनीच मुळात अस्तित्वात नाही, असे सुरुवातीच्या तपासात आढळून आल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे पुरवठादार व जिल्हा शासकीय रुग्णालयाची यामध्ये मिलीभगत असल्याचे बोलले जात आहे. धाराशिव जिल्ह्यातही औषध निर्मात्या कंपन्यांकडून आवश्यक गुणवत्ता नसणाऱ्या सहा प्रकारच्या गोळ्यांचा पुरवठा करण्यात आला होता. प्रयोगशाळेच्या अहवालानुसार तीन टप्प्यात जवळपास पावणेतीन लाख गोळ्या त्या कंपनीने परत बोलावून घेतल्या. औषध पुरवठा करणाऱ्या त्या एजन्सीला धाराशिवमध्ये काळ्या यादीत टाकण्यात आले आहेत. धाराशिव जिल्ह्यात आलेल्या सिप्रो-२५० एमजीच्या १ लाख ९ हजार २४०, सेफिक्सिम १ लाख १ हजार ३६२, सिप्रोफ्लोक्सासिन-५०० च्या ४० हजार २५८, एजिथ्रोमाइसिन १० हजार ८६४, अमॉक्सिसिलिन-३७५ च्या १९ हजार ६३०, अमॉक्सिसिलिन-६२५ च्या ७ हजार २४० अशा एकूण २ लाख ८८ हजारांहून अधिक गोळ्यांमध्ये आवश्यक गुणवत्ता नसल्याने संबंधित कंपनीला परत केल्या आहेत. यापैकी काही गोळ्या संबंधित कंपन्यांनी बदलून दिल्याचे समजते.

छत्रपती संभाजीनगरमधील घाटी रुग्णालयातही २३ प्रकारच्या औषधी संशयाच्या भोवऱ्यात आहेत. विशेष म्हणजे वरिष्ठांच्या आदेशानुसार त्या ३३ प्रकारच्या औषधींचा वापर थांबविण्यात आला. शिवाय यातील २६ प्रकारची औषधी संपलेली असल्याने ज्या औषधींचा वापर थांबविला आहे. त्याऐवजी पर्यायी औषधी रुग्णांना दिली जात असल्याचे घाटी येथील अधिष्ठाता यांनी सांगितले. मराठवाड्यातील बीड जिल्हा तसा नेहमीच चर्चेत असतो. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयास बनावट औषधांचा पुरवठा करणारी एक टोळी उघडकीस आली आहे. मराठवाड्यात सर्वप्रथम या ठिकाणी बनावट गोळ्यांच्या पुरवठा झाल्याचे उघडकीस आल्यानंतर या प्रकरणात असलेल्या टोळ्याच समोर आल्या आहेत. अंबाजोगाई येथील रुग्णालयात अॅझिमॅसीन-५०० या औषधांचे सॅम्पल नमुने तपासणीसाठी घेण्यात आले होते. त्यांची तपासणी होऊन २३ ऑक्टोबर २०२४ रोजी आलेल्या अहवालात सदरील औषध हे रुग्णांसाठी निष्क्रिय व बनावट असल्याचे उघडकीस आले. या गोळ्यांमध्ये अॅजिथ्रोमायसीन हा घटक असणे अत्यंत आवश्यक होते; परंतु सदरील गोळ्यांमध्ये अॅजिथ्रोमायसीन नसल्यामुळे हा बनावट गोळ्यांचा प्रकार उघडकीस आला. किमान साडेआठ हजार रुग्णांच्या पोटात या गोळ्या गेल्या. यामधून जीवित हानी झाली नाही, असे सांगितले जात असले तरी या प्रकरणाच्या खोलाशी गेल्यास यामधून काहीतरी वेगळेच बाहेर येईल, असे या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे. याप्रकरणी सुरेश दत्तात्रय पाटील, मिहीर त्रिवेदी (रा. भिवंडी जि. ठाणे), द्विती सुमित त्रिवेदी, (सुरत) व विजय शैलेंद्र चौधरी रा. मीरा रोड, ठाणे या चौघा जणांविरुद्ध गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे त्या औषधीच्या तक्रारीनंतर सव्वा वर्षाने अहवाल प्राप्त झाला व त्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला. म्हणजेच या दरम्यान हजारो रुग्णांच्या पोटात त्या गोळ्या गेल्या. त्या बनावट गोळ्या रुग्णांसाठी किती घातक ठरल्या हे आता शोधण्याची गरज आहे. मराठवाड्यात ज्या औषधी कंपनीने गोळ्या पुरवठा केल्यात त्यापैकी उत्तराखंडमधील ब्रिस्टल फार्मा, केरळमधील रिफंड फार्मा, बायोटेक फॉर्म्युलेशन व मेलबर्न बायो सायन्स तसेच एस एम एन लॅब या पाच कंपन्या बनावट असल्याचे समोर आले आहे. या कंपन्यांनी प्रत्येक ठिकाणी बनावट औषधांचा पुरवठा केला असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे या कंपन्यांची औषधे असल्यास त्याबाबत त्वरित कळविण्यात यावे, असे पत्र संचालक कार्यालयातर्फे मराठवाड्यातील जिल्हा रुग्णालयांना पाठविण्यात आले आहेत. पूर्वी एक म्हण खूप प्रसिद्ध होती. शहाण्या माणसाने कोर्टाची व पोलीस स्थानकाची पायरी चढू नये, असे म्हटले जायचे; परंतु आता त्यामध्ये आणखी एक भर पडली आहे. शहाण्याला कधीही दवाखान्यात जाण्याची वेळ येऊ नये, असेच मराठवाड्यातील अनेक प्रकरणांवरून म्हणता येईल. आरोग्य यंत्रणेतील पुरवठादार तसेच ठेकेदार यंत्रणा रुग्णांच्या जीवावर उठली आहे. बनावट औषधांचा पुरवठा करून या लोकांनी काय साध्य केले हे नव्याने सांगण्याची गरज नाही. अन्न व औषधी प्रशासनाचा कारभारही रुग्णांसाठी जीवघेणाच ठरत आहे. तपासणीसाठी पाठविलेल्या गोळ्यांबाबतचा अहवाल सव्वा वर्षाने प्राप्त झाला आणि त्यानंतर गुन्ह्याची नोंद होते, म्हणजे आरोग्य यंत्रणा तसेच अन्न व औषध प्रशासन हे दोघेही चक्क झोपेत आहेत की काय? असेच म्हणण्याची वेळ अंबाजोगाई येथील बनावट गोळ्या प्रकरणानंतर सर्वांच्या लक्षात येत आहे. मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात औषधी गोळ्यांचा वेगळाच काळाबाजार चालतो. या ठिकाणी दाखल असलेल्या रुग्णाला अनेकदा बाहेरून औषध-गोळ्या विकत आणाव्या लागतात.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, नांदेड, बीड, धाराशिव, जालना, परभणी, हिंगोली यासह लातूर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात सर्वत्र अलबेल कारभार आहे. रुग्णांना मिळणाऱ्या सुविधा, औषधोपचार व कर्मचारी व डॉक्टरांची वागणूक यावरून अनेकदा बाचाबाची होते, तसेच त्याचे पर्यवसान भांडणात झाल्याचे पाहावयास मिळते. रुग्णांचे वागणे प्रशासनाला कदाचित वाईट वाटणारे असेल; परंतु त्याच रुग्णांना दिले जाणारे बनावट औषध जीवघेणे ठरत आहेत. अशा परिस्थितीत दोष रुग्णांचा की आर्थिक फायद्यासाठी बनावट औषधी विक्रेते करणाऱ्या कंपन्यांचा व प्रशासनाचा? हा विचार कुठेतरी गांभीर्याने होणे गरजेचे आहे. मराठवाड्यात बोगस व बनावट औषधींच्या पुरवठ्यावरून पुन्हा एकदा रुग्णालयांची तसेच औषधांची खातरजमा करून त्यात दोषींविरुद्ध कडक शिक्षेची अंमलबजावणी व तरतूद आवश्यक आहे. नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व शासकीय रुग्णालयात कुत्रा चावल्यानंतर आलेल्या रुग्णांना देण्यासाठी इंजेक्शनच उपलब्ध नसल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. जीव मुठीत घेऊन उपचार घेण्यासाठी आलेल्या रुग्णाला बाहेरच्या खासगी मेडिकलमधून इंजेक्शन विकत आणावे लागत आहे. हा प्रकार नित्याचाच झाला आहे. असाच एक प्रकार निवडणूक प्रचारादरम्यान घडला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी नांदेडमध्ये असताना दुपारी तीन वाजता एका ४० वर्षीय महिलेला सभेसाठी जाताना रस्त्यावरील कुत्र्याने चावा घेतला. त्यानंतर त्या महिलेने नांदेडच्या श्यामनगर येथील महिला रुग्णालयात धाव घेतली. त्या ठिकाणी कुत्रा चावल्यानंतर दिले जाणारे इंजेक्शन उपलब्ध नाही, असे रुग्णाला सांगितले . त्यांना शिवाजी पुतळा येथील सरकारी दवाखान्यात पाठविण्यात आले . त्या ठिकाणी गेल्यावर त्या महिलेला सांगण्यात आले की, या जखमेवर लागणारे तीन पैकी केवळ दोनच इंजेक्शन येथे उपलब्ध आहेत. त्यामुळे तुम्ही येथून आठ किलोमीटर दूर असलेल्या विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात जा. सदरील महिला विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे गेल्यानंतर उपचार करत असलेल्या डॉक्टरांनी सांगितले की, तुम्हाला द्यायचे असलेले इंजेक्शन आमच्या शासकीय रुग्णालयात उपलब्ध नाही. तुम्ही ते बाहेरच्या खासगी मेडिकलमधून विकत आणा. ते इंजेक्शन रुग्णाला विकत आणावे लागले. त्यासाठी रुग्णाला ४६०० रुपयांचा खर्च आला. हा प्रकार आजही सुरूच आहे. जिल्हा शासकीय रुग्णालयात दररोज श्वान दंशाचे किमान २५-३० रुग्ण येतात. एकंदरीत पाहिले तर मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यात असलेल्या शासकीय रुग्णालयात होत असलेल्या औषधींच्या पुरवठ्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.बनावट औषधी असो की श्वानदंश असो, एखाद्याचा जीव गेल्यावर आरोग्य यंत्रणा जागी होणार आहे की काय? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

# अण्णा हजारे किती चूक किती बरोबर ?-हनुमंत भोसले

**केज । प्रतिनिधी**

सामाजिक क्षेत्रात मोठी झालेली माणसे जेव्हा चुकतात तेव्हा त्यांच्या बद्दल बोलताना किंवा ऐकताना फार विचार करून व्यक्त व्हावं लागतं. नुकताच दिल्लीच्या विधानसभानिवडणुकीचा निकाल घोषित झाला.या निवडणुकीत आमआदमी पक्षाचा मोठा पराभव झाला त्यांना ७० पैकी केवळ २२जागा मिळाल्या या निकालानंतर संपूर्ण देशामध्ये वेगवेगळ्या प्रतिक्रिया येऊ लागल्या. अरविंद केजरीवाल व त्यांच्या पक्षाबद्दल वेगवेगळी मते व्यक्त होऊ लागली.यामध्ये संपूर्ण मीडियामध्ये जीप्रतिक्रिया ठळकपणे अधोरेखीत झाली ती होती महाराष्ट्राचे ज्येष्ठ समाजसेवक माननीय अण्णा हजारे यांची प्रतिक्रिया !

अण्णा हजारे यांनी अरविंद केजरीवाल यांना दोष देत त्यांनी पक्ष व राजकारण यात पडायला नको होतं अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.अण्णा हजारे हे महाराष्ट्राचे ज्येष्ठ समाजसेवक आहेत खरे पाहता त्यांनी एकेकाळी समाजातील वाईट आणि चुकीच्या प्रवृत्ती विरोधात मोठा लढा देताना खूप मोठे योगदान दिले आहे. भ्रष्टाचार निर्मूलन जन आंदोलन किंवा माहिती अधिकाराचा कायदा या गोष्टी महाराष्ट्राला मिळाल्या त्या केवळ अण्णा हजारे यांच्या अथक परिश्रमातून आणि त्यांनी उभे केलेल्या आंदोलनातूनच याबाबत कोणालाही शंका असण्याचे कारण नाही. राळेगण सिद्धीच्या ग्रामविकास,पाणी आडवा -पाणी जिरवा,व्यसनमुक्ती यासारख्या सामाजिक मुद्यावर त्यांनी महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेणारे कार्य केले.म्हणूनच त्यांच्या भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनात माझ्यासारखे अनेक लोक सक्रिय होते. या जनआंदोलनाचे मी केज तालुक्याचे नेतृत्व अनेक वर्षे केले.अण्णा एक कृतिशील जन आंदोलक होते.मात्र ते वैचारिक दृष्टया परिपक्व नक्कीच नव्हते.त्यामुळे सततच्या उपोषण अजेंड्या बाहेर त्यांना वैचारिक मुद्याआधारे शासनाला फारसे नमवता आले नाही. त्या त्या वेळीच्या शासनाने त्यांचे जनआंदोलन लोकांनी हातात घेऊ नये याची काळजी घेत त्यांच्या कांही मागण्या मान्य केल्या ज्यामध्ये माहिती अधिकार व इतर कांही महत्वाच्या बाबीचा समावेश आहे.त्यांच्या चांगल्या कार्याबद्दल त्यांचे कौतुकच ! मात्र जगातील कोणताच व्यक्ती आपले यश,जनसमर्थन व त्यातून मिळालेल्या प्रसिद्धीच्या अहंकारातून सुटलेला नाही मग तो राजकारणा तील लोकप्रतिनिधी असो,समाजसुधारक असो की आजच्या काळातील साधू-संत असोत प्रसिद्धीझोताच्या वलयाखाली ते स्वतःला नियंत्रित ठेवू शकले नाहीत.अशा लोकांनी आपापल्या क्षेत्रात आपल्यापेक्षा कोणी मोठे होणार नाही याची पूर्ण काळजी घेतली आहे. त्यामुळे महाराष्ट्रात राळेगणसिद्धी सारखी दुसरी आदर्श गावे महाराष्ट्रात दिसली नाहीत.जी कांहीथोडीफार पुढे आली ती स्वतःच्या ताकदीनेच.नसता अण्णांनी प्रयत्न केला असता तर निश्चित अशी अनेक गावे उभी राहिली असती.आज दिल्ली पराभवानंतर मा.अण्णा हजारे यांनी अरविंद केजरीवाल यांच्यावर केलेली टीका निव्वळ पोरकटपणा वाटतो.आज देश व राज्यातील राजकारणाने अत्यंत खालची पातळी गाठली आहे.प्रामाणिकपणा किंवा इतर चांगली मूल्ये बाळगणाऱ्यांना राजकारणात जायचं म्हटलं तर अशक्य बाब झालीय.राजकारणात जायचं तर तुमच्या विचारांना अजिबात स्थान नाही.तुम्हाला संबंधित राजकीय पक्षाचीवैचारिक व इतर कृतिशील गुलामगिरी स्वीकारूनच प्रवेश घ्यावा लागतो.आज



जरी दिल्लीत आमआदमी पक्षाचा पराभव झाला असला तरी भाजप सारख्या पक्षाला गेली बारा वर्षे देशाच्या राजधानीतील सत्तेपासून दूर ठेवणं सोपं काम नव्हतं.लोक प्रचंड आशावादी आहेत.तरीही बारा वर्षे या पक्षाने दिल्लीच्या मतदारांची मने जिंकून सत्ता मिळवली होती हे कांही कमी नव्हते.अण्णा हजारे नेहमी देशातील स्वच्छ प्रतिमा असणाऱ्या युवक नागरिकांनी राजकारणात यावं असं आवाहन करतात तर मग आम्ही त्यांनी विचारू इच्छितो की जर आपण अरविंद केजरीवाल व त्यांच्या सहकाऱ्यांनी देशाच्या राजकारणात पर्याय म्हणून पक्ष काढून राजकारणात उतरले असतील तर त्यांनी चूक केली असे का म्हणता? तर मग चांगल्या व इच्छुक लोकांनी आज भ्रष्टाचाराचे आरोप असणाऱ्या काँग्रेस, भाजप,राष्ट्रवादी व शिवसेना अशा पक्षात जावं का? हे पक्ष तर प्रवेश घेण्यापूर्वीच आपल्या विचार व कार्याच्या अटी समोर ठेवतात ज्या मान्य करूनच त्यांच्या पक्षात प्रवेश घावा लागतो.अशा तो व्यक्ती कितीही चांगल्या विचार व कृतीचा असला तरी तो त्या पक्षात आपल्या स्वतःच्या मता नुसार काम करण्यास स्वतंत्र नसतो.तर मग राजकारणात चांगल्या माणसांनी येण्याचा काय उपयोग ? अशा वेळी अण्णा हजारे यांनी आजच्या राजकारणाला पर्याय म्हणून पुढे आलेल्या आम आदमी पक्षाला मोठ्या मनाने सहकार्य करायला हवे होते.पाहिजे तर अण्णा हजारे यांनी या पक्षाला कांही नियम व अटीची आचारसंहिता घालून दिली असती तरी चालले असते.परंतु राजकारणात उतरलेल्या अरविंद केजरीवाल व सहकाऱ्यांची प्रतिमा आपल्या सामाजिक करण्यापेक्षा अधिक उंचावत असल्याचे पाहून अण्णांनी चक्क अरविंद केजरीवाल व आपला टीकेचे लक्ष बनवले ही त्यांची कृती त्यांची मोठी चूक होती. तसं पाहिलंतर अण्णा हे महाराष्ट्राच्या सामाजिक क्षेत्रातील जेष्ठ समाजसेवक आहेत.ते महाराष्ट्राला नक्कीच परिचित होते.मात्र दिल्ली आंदोलनापूर्वी ते संपूर्ण देशवासियांना नक्कीच परिचित नव्हते.अण्णानां देशपातळीवर ओळख निर्माण करून देशाच्या प्रसिद्धी झोतात आणले ते अरविंद केजरीवाल व त्यांच्या टीमच्या आंदोलनानेच.यापूर्वी अण्णांचे कोणतेच आंदोलन महाराष्ट्राच्या बाहेर झालेले नव्हते. अपवादाने एखादे झाले असले तरी त्याला फार मोठे वलय प्राप्त झालेले नव्हते.याची जाणीवही अण्णांनी ठेवायला हवी होती.तसेही सध्या अण्णा हे ठराविक पक्षांच्या सरकार विरोधातच आंदोलने करतात व इतर वेळी शांत बसतात असा मोठा आरोप महाराष्ट्राच्या बहुसंख्याकांच्या तोंडातून स्पष्टपणे ऐकायलामिळतो आहे जो खरा वाटूलागतो. खरं तर मी एकेकाळचा अण्णांचा कट्टर कार्यकर्ता होतो.पण मी माझे डोके वापरतो.मी चांगल्या विचार कार्याचा समर्थक नक्कीच आहे पण ज्या लोकप्रतिनिधी,समाज सेवक किंवा अध्यात्मिक महाराजांवर,किर्तनकारा वर मी विश्वास ठेवलाआहे तो जर चुकला असेल तर त्याला चूक म्हणून त्याचा निषेध करण्याचं सामर्थ्य माझ्यात आहे.असे लोक चुकले तरी त्यांचे शिष्यत्व करत राहणारी मानसिक गुलामगिरी मी नाकारतो. म्हणून एकेकाळी अण्णांचं कट्टर समर्थन करत केज शहरातत्यांच्या सभा घेणारा मी आणि आज त्यांच्याबद्दलवास्तव लिहिताना त्यांच्यावर त्यांची चूक दाखवणारा मी कांहीना आवडेल असंही नाही.आजअण्णा, अरविंद केजरीवाल व त्यांच्या सहकाऱ्यांनी राजकारणात जाऊन चूक केली म्हणत असतील तर मग राजकारणात चांगली माणसे काय आभाळातून खाली पडणार आहेत का? आज गावात सरपंचांविरोधात तोंड उघडायला लोक भितात तर मग भाजपसारख्या बलाढ्य पक्षाच्या साम-दाम-दंड नीतीला भेदून दिल्लीत २२ जागा मिळवणाऱ्या आमआदमी पक्षाचे कौतुकच व्हायला हवे.म्हणून मा.अण्णा हजारे यांनी आजपर्यंत दिलेल्या सामाजिक योगदानासाठी आम्ही त्यांचे शंभर वेळा कृतज्ञता व्यक्त करून आभार मानू मात्र त्यांच्या आजच्या चुकीच्या भूमिकेचे अजिबात समर्थन करता येणार नाही...!

# माता रमाई च्या त्यागा मुळेच बाबासाहेब आंबेडकर शिक्षण घेऊन समाजकार्य करू शकले-कॅप्टन राजाभाऊ आठवले



**बीड । प्रतिनिधी**

दिनांक ०७/०२/२०२५ रोजी त्यागमूर्ती माता रमाई यांची १२७ वी जंयती बलभीम नगर बुद्धविहार शिवाजीनगर बीड येथे मोठया उल्हासात साजरी करण्यात आली याप्रसंगी मोठ्याप्रमाणात बौद्ध उपासक उपासिका उपस्थित होते, प्रथम आदर्शाची पुजा करुन कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.आध्यक्ष म्हणून चंद्रामाय जाधव व फुलामाय इंगळे शोभाताई आठवले तर प्रमुख

पाहुणे म्हणून आर. पी आय. चे प्रदशाध्यक्ष पप्पूजी कागदे साहेब,जेष्ठ नगर सेवक नर्सिंग नाईकवाडे, नगरसेवक विनोद मुळूक, जिल्हा प्रमुख सचिन मुळूक,निर्भीड जनपत्रकार सुनिलजी डोंगरेसर,अशोक शेजवळ, आसाराम औसरमाल साहेब, कॅप्टन राजाभाऊ आठवले, डी. जी वानखेडेबाबा,प्रशांतजी वासनिक,साहेबराव तरकासे,संजय मिसाळ, महेंद्र वडमारे, प्रमोद शिंदे, चेतन पवार, निखिल सवाई याची उपस्थित होती या कार्यक्रमात निशांत वडमारे या बालकाने माता रमाई यांचे जीवन चरित्र सांगून गीत गायले त्या बद्दल ऍड तेजस वडमारे व साहेबराव तारकसेसाहेबांनी त्यास प्रत्येकी २०० रुपये बक्षीस व जयंती उत्सव समिती कडून एक रमाई मातेचे पुस्तक भेट दिले त्यानंतर .कॅप्टन राजाभाऊ आठवले यानी माता रमाई यांच्या जीवनातील त्याग आणि बलिदाना बद्दल सांगुन त्यानी बाबासाहेबनां कशी खंबीर साथ आणि बाबासाहेब अमेरिकेत होते तेव्हा रमाबाईंनी खूप कठीण दिवस घालवले. रमाबाईंनी या कठीण काळातही कोणतीही तक्रार न करता मोठ्या संयमाने हसून दिवस काढले. डिसेंबर १९४० मध्ये बाबासाहेब डॉ. भीमराव आंबेडकर यांनी थॉट्स ऑफ पाकिस्तान हे पुस्तक लिहिले आणि ते केवळ त्यांची पत्नी रमाबाई रामू यांना समर्पित केले, हे सांगत असताना सर्वांचे डोळे भरून आले, त्यानंतर अंजली तेजस वडमारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

सरनतय ने कार्यक्रम संपन्न

झाल्यानंतर दुपारी २ ते ५ पर्यंत भोजनदान करण्यात आले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सिद्धार्थ वडमारे, उपाध्यक्ष अक्षय जोगदंड, सचिव अजय जाधव, राज जाधव, आर्यन साळवे, नागेश साळवे, अनिल अंकुटे,राजू धनवे संजय धनवे, प्रेम जोगदंड, सुरज वडमारे, शशी गवळी, यश गवळी,नितीन भालेराव निशांत वाघमारे, सनी जाधव सिद्धार्थ साळवे विराज साळवे रितेश साळवे आर्यन खेमाडे यांनी मेहनत घेतली त्याना ड तेजस वडमारे, गौतम खेमाडे, नितीन वाघमारे,बाप्पू खेमाडे, सिद्धार्थ सोनवणे, दिलीप गवळी अंकुश जाधव, निवृत्ती वाघमारे, मंगेश वडमारे, विशाल वडमारे यांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमासाठी अंजली वडमारे, सरिता खेमाडे, आशा धनवे, कोमल वाघमारे, सुशीला साळवे, राधा साळवे, हौसाबाई वाघमारे, हेमा वडमारे, उर्मिला वडमारे, सुधा वडमारे, क्रांती धनवे आशा भालेराव, वर्षा खेमाडे, साखराबाई वाघमारे,जयश्री वडमारे,अर्चना जाधव, पद्मिणीबाई वडमारे,शिवकन्या खेमाडे, प्रीती जाधव,रमाबाई सोनवणे,नंदा वडमारे,राणी साळवे शिला साळवे, मंदा वडमारे,किरण वडमारे,सांची वडमारे,हर्षदा साळवे नंदिनी साळवे, जानवी वाघमारे, सानिका जाधव, अदिती धनवे .व परिसरातील सर्व शिव फुले, शाहू आंबेडकर याच्या विचाराचे बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

# गेवराईच्या द बा घुमरे पब्लिक स्कूलमध्ये स्नेहसंमेलन व मातापालक मेळावा संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

शैक्षणिक सामाजिक , सांस्कृतिक व शिक्षण क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या कै.वंचळाबाई घुमरे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित द.बा घुमरे पब्लिक स्कूल गेवराई येथे वार्षिक स्नेहसंमेलन व माता पालक मेळावा उत्साहात साजरा करण्यात आला. राजमाता जिजाऊ माँसाहेब, सरस्वती आणि संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. द.बा घुमरे (तात्या) यांच्या प्रतिमेच्या पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव दीपक घुमरे तर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती भाऊसाहेब नाटकर, डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे, सामाजिक कार्यकर्ते डॉ. उद्धवराव घोडके, संपादक शिवाजीराव ढाकणे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते दगडू चव्हाण, माध्यमिक शाळेचे



मुख्याध्यापक थेटे सी एल, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक घुमरे एस के यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी वेदांत तौर, येवले तनुष्का, शेख हिबाअनम , पवार जिज्ञासा, घुमरे आर्या, फलके मुक्ता या विद्यार्थ्यांनी तर श्रीमती सुप्रिया मोरे यांनी पालक प्रतिनिधी म्हणून शाळा आणि येथील शिक्षकांबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर वर्षभरामध्ये विद्यार्थ्यांनी केलेल्या वेगवेगळ्या क्षेत्रातील कामगिरीबद्दल त्यांचा गुण गौरव बक्षीस वितरणाच्या माध्यमातून करण्यात आला. यामध्ये जी टी एस परीक्षेतील विद्यार्थी, एन एम एम एस परीक्षेमधील विद्यार्थी, स्कॉलरशिप परीक्षेतील विद्यार्थी, गुरुकुल प्रज्ञाशोध परीक्षेतील विद्यार्थी, होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेतील विद्यार्थी, डॉक्टर हेडगेवार जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धेतील विद्यार्थी, नॅशनल लेवल सायन्स, मॅथ, इंग्लिश,ओलंपियाड स्पर्धेतील विद्यार्थी, गेवराई येथील संपन्न झालेल्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनातील विद्यार्थी तसेच शालेय स्तरावर आयोजित विविध स्पर्धेतील विद्यार्थी यांचा ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांना वाव देण्यासाठी आयोजित केलेल्या स्नेहसंमेलनामध्ये कोळीगीत, शेतकरी गीत, देशभक्ती गीत, विनोदी नाटके असे वेगवेगळे कलाविष्कार सादर करून प्रेक्षकांचे मन जिंकले. या कार्यक्रमाला विद्यार्थी,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच माता पालक वर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिंदे ए जे, श्रीमती चौधरी मॅडम, श्रीमती कुलकर्णी मॅडम, श्रीमती काळे मॅडम व श्रीमती पूजा मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री शिंदे ए जे यांनी केले.

## अँपा डॉक्टर्स महिला क्रिकेट चषक स्पर्धा अंबाजोगाई

# सर्व डॉक्टर्सनी आपल्या शारीरिक तंदुरुस्तीची काळजी घ्यावी-डॉ राजेश इंगोले

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई मेडीकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या अँपा डॉक्टर्स महिला चषक स्पर्धेत रॉयल फायर्स संघाने विजेतेपद पटकावले तर योगेश्वरी चॅम्पियन्स संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. विजेत्या व उपविजेता संघास इंडीयन मेडीकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतीक समिती अध्यक्ष डॉ राजेश इंगोले, अँपा संघटनेच्या अध्यक्षा डॉ सुलभा पाटील, उपाध्यक्ष डॉ सुनील नांदलगावकर,सचिव डॉ ऋषिकेश घुले,डॉ संदीप जैन,डॉ मनीषा पवार यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ राजेश इंगोले यांनी डॉक्टर्स आपल्या व्यस्त आयुष्यात आपल्या अनेक आवडी निवडी विसरून जातात. प्रत्येक डॉक्टरमध्ये एक व्यक्ती म्हणून आपली आवड आपले छंद असतात. कुणी छान खेळ खेळतात, कुणी छान चित्रकार असतो, कुणी छान गायक, नर्तक नर्तिका, कलाकार, फोटोग्राफर असतात पण वैद्यकीय सेवा क्षेत्रात उतरल्यावर वेळेअभावी डॉक्टर्स मधील या अभिव्यक्ती लोप पावतात. अँपा डॉक्टर्स असोसिएशनच्या कर्तबगार महिला अध्यक्ष डॉ सुलभा पाटील यांनी प्रथमच अभिनवरीत्या डॉक्टर्स साठी विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करून डॉक्टर्समधील खेळाडूला जागृत केलं आहे याबद्दल त्यांचे आभार मानले. सर्व डॉक्टर्सनी आता हा जागृत झालेला खेळाडू आता लोप पावू न देता वर्षभर आपला शारीरिक फिटनेस कायम राखावा असे आवाहन केले. आपला व्यवसाय आपले पोट भरतो पण कलाक्रीडा कौशल्य आपलं जीवन जगणं समृद्ध करत आयुष्याला अर्थ देतात. त्यामुळे प्रत्येकाने आपली कला ,आपले छंद आयुष्यात जोपासून



प्रत्येक क्षणाचा आनंद घ्यायला शिकावा अशी अपेक्षा व्यक्त केली. अँपाच्या अध्यक्ष सुलभा पाटील यांनी या क्रीडा स्पर्धा प्रत्येक डॉक्टर्सला नवचैतन्य, नवी ऊर्जा देण्याचं काम करत आहेत असे सांगत आपल्या अध्यक्षतेखाली डॉक्टर्स साठी यापुढेही आता विविध सांस्कृतिक आणि इतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल असे सूतोवाच करत विजेत्या व उपविजेत्या संघाचे अभिनंदन केले. रॉयल फायर्स या विजेत्या संघाच्या कर्णधार डॉ प्रिया नागरगोजे तसेच योगेश्वरी चॅम्पियन्स या उपविजेत्या संघाच्या कर्णधार डॉ स्वाती हारे यांना डॉ राजेश इंगोले यांच्या हस्ते अँपा चषक देऊन गौरविण्यात आले तर या सामन्यात फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात उत्कृष्ट कामगिरी बजावत आपल्या फायर्स संघाला विजेतेपद मिळवून देणाऱ्या डॉ योगिनी नागरगोजे यांना सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सामन्यासाठी पंच म्हणून बिंबिसार वाघमारे व संघर्ष इंगळे,स्कोरर म्हणून चाफा भडके व प्रा अनंत कांबळे तर समालोचक म्हणून डॉ देवराव चामणर,डॉ सचिन कस्तुरे, डॉ संदीप जैन यांनी कामगिरी बजावली. योगेश्वरी महाविद्यालयाच्या मैदानात सुरू असलेल्या ह्या क्रिकेट स्पर्धा अत्यंत जल्लोषात व उत्साहात पार पडल्या.

# नौकरी हे जगण्याचे एक साधन आहे गटशिक्षण अधिकारी लक्ष्मणराव बेडसकर

**केज । प्रतिनिधी**

साने गुरुजी निवासी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये इयत्ता दहावी,बारावीच्या निरोप समारंभ निमित्त गटशिक्षणाधिकारी श्री. लक्ष्मणराव बेडसकर हे बोलत होते.साने गुरुजी निवासी विद्यालय हे एक केज तालुक्यातील आदर्श विद्यालय आहे.शिक्षणा पासून कोसो दूर असणाऱ्या वंचित घटकासाठी चालणार हे विद्यालय एक आदर्श विद्यालय ठरलं आहे या विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या विचाराची प्रगल्भता उत्कृष्ट आहे. त्यामुळे पुढील जीवनात ते डॉक्टर ,इंजिनियर जरी बनले नाही तरीएकआदर्श नागरिक म्हणून जीवन नक्कीच जगतील त्याच बरोबर नोकरी हे जगण्याचे एक साधन आहे.मात्र ते एकमेव नाही याचा विद्यार्थ्यांनी विचार करावा.आज जरीएखाद्या विद्यार्थ्यास कमी श्रेणीचे मार्क असतील तरी त्याने ठरवल्यानंतर तो उच्च कोटीतील पाहिजे त्या क्षेत्रामध्ये भरारी घेऊ शकेल.विद्यार्थ्यांना कोणी कितीही काहीही शिकवायचे म्हटले तरी विद्यार्थ्यांमध्ये मुळातच उपजत



८० टक्के गुण असतात २०% गुण शाळा महाविद्यालय,खाजगी शिकवण्या यातून मिळत असतात.तेव्हा इतरआणि शिकवले म्हणून मुले शिकणार नाहीत मुलांनी शिकायचे ठरवले की मुले शंभर टक्के शिकतात. क्रिकेट विश्वात दहावी अनुत्तीर्ण असणारा सचिन तेंडुलकर जगावर अधिराज्य गाजवले आहे. तर गान कोकिळा लता मंगेशकर यांचीही त्यांनी उदाहरण देऊन विद्यार्थ्यांना शिक्षणात भरारी घेण्यासाठी प्रेरणा दिली.तसेच मी एक शिक्षण क्षेत्राबरोबरच सामाजिक काम करणारा अधिकारी आहे. विद्यार्थ्यांनो तुम्हाला शिक्षण घेत असताना कोणत्याही प्रकारची गरज पडली तर सदैव माझी दारे आपणासाठी उघडे आहेत असेहीत्यांनी विद्यार्थ्यांना आश्वासित केले.तसेच कराड दांपत्याने या शाळेला वाहून घेतले आहे असे गौरव उद्गार यावेळेस काढले.कार्यक्रमाचे अध्यक्ष अड.उद्धवराव कराड यांनीहीविद्यार्थ्यांना कोठे जायचे आहे हे ठरवल्याशिवाय मार्ग सापडत नाही रस्ते अनेक आहेत जर आपण कोठे जायचे हे ठरवले तर रस्ता नक्कीच सापडेल.जग खूप मोठे आहे आपल्या छोट्या विश्वातून बाहेर या व ध्येय निश्चितकरा.भरारी घेण्यासाठी सिद्ध व्हाअसे आवाहन विद्यार्थ्यांना केले व आपल्या जीवनात कुठेही तुम्हाला गरज भासली तर निश्चितच साने गुरुजी विद्यालय सदैव आपल्या पाठीशी असेल असे मत व्यक्त केले.यावेळी वस्तीगृह अधीक्षक बाबासाहेब चाटे सर,सुदर्शन चोले सरयांनी आपले मनोगत व्यक्तकेले तर विद्यार्थ्यांनी शाळे विषयी आपले मत मांडले या कार्यक्रमाचेप्रास्ताविक शाळेच्या प्राचार्य कविता कराड मॅडम यांनी केले तर सूत्रसंचालन जोशी मॅडम यांनी केले यावेळी मंचावर वस्तीगृह अधीक्षिका लहाने मॅडम, भांगे सचिन,काळे सचिन, चाटे लहु,पवार ज्ञानेश्वर, चंपाकला वडमारे या उपस्थित होत्या.या कार्यक्रमास इयत्ता दहावी व बारावीचे सर्व शिक्षक व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.


# सत्य परेशान हो सकता है ,लेकिन परास्त नही।

## मी येडेश्वरीला नव्हे तर कर्नाटकला गेलो होतो; मुकादमाचा लेखी जबाब

**बीड । प्रतिनिधी**

मी येडेश्वरी शुगर मिल लि. या साखर कारखाण्याची मुकादमी करून कुटुंबाची उपजिवीका भागवतो. दरम्यान, मी कारखाना कर्मचाऱ्यासोबत कामनिमित्त कर्नाटक येथे गेलो होतो. परंतु, माझ्या मुलीला हे माहीत नसल्याने तिचा गैरसमज झाला. त्यामुळे ती पोलिस ठाण्यात गेली. त्यामुळे माझी येडेश्वरी कारखान्याबाबत कसलीही तक्रार नाही, असा लेखी जबाब मुकादम किसन सर्वे यांनी दिला आहे

जबाबात म्हटले आहे, मी किसन भानुदास सुर्वे, वय ३२ वर्ष, व्यवसाय मुकादाम, रा.सुर्याचीवाडी, समक्ष पोलीस ठाणे बीड ग्रामीण येथे विचारले वरून सांगतो, मी येडेश्वरी शुगर मिल लि.या साखर कारखाण्याची मुकादमी करून कुटुंबाची उपजिवीका भागवतो. दि.०७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता माझे मेव्हणे सदाशीव सातेराम चव्हाण यांच्यासोबत कर्नाटक येथील मुकादम आयुब हबीब शेख यांच्याकडे येडेश्वरी साखर कारखाना यांची बाकी असल्याने येडेश्वरी साखर कारखान्यातील कर्मचाऱ्यांसोबत कर्नाटक येथे गेलो होतो. कर्नाटक येथे जात असल्याबाबत घरच्यांना सांगीतले नव्हते. मुकादम आयुब हबीब शेख यास धोधण्यासाठी माझा एक दिवस उलटला. मी दि. ९ फेब्रुवारी रोजी बीड येथे परत आल्यावर मला गावातील लोकांनी सांगीतले मी शितल सदाशिव चव्हाण ही पोलीस ठाणे बीड ग्रामीण येथे तक्रार देण्यासाठी गेली आहे. सबब मी व मेव्हणे लागलीच ३ वाजता पोलीस ठाणे बीड ग्रामीण येथे येऊन मी कर्नाटक येथे गेलो असल्याने शितल हीस सांगीतले. मी स्वखुशीन येडेश्वरी शुगर मिल लि. यांच्या कर्मचाऱ्यासोबत कर्नाटक येथे गेलो होतो. यामुळे माझी कोणाविरुध्द काही एक तक्रार नाही, असे म्हटले आहे.


दिनांक 09/02/2025

: जबाब :

मी किसन भानुदास सुर्वे, वय 32 वर्ष, व्यवसाय मुकादाम, रा.सुर्याचीवाडी, ता. जि.बीड. मो.नं.9970802161.

समक्ष पोलीस ठाणे बीड ग्रामीण येथे विचारले वरुन सांगतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असून मी येडेश्वरी शुगर मिल लि. या साकर कारखाण्याची मुकादमी करून कुटुंबाची उपजिवीका भागवतो.

मी दिनांक 07/02/2025 रोजी सकाळी 10.00 वा. माझे मेव्हणे सदाशीव सातेराम चव्हाण यांच्यासोबत कर्नाटक येथील मुकादम आयुब हबीब शेख यांच्याकडे येडेश्वरी साखर कारखाना यांची बाकी असल्याने येडेश्वरी साखर कारखान्यातील कर्मचाऱ्यांसोबत कर्नाटक येथे गेलो होतो. मी कर्नाटक येथे जात असल्याबाबत घरच्यांना सांगितले नव्हते. मुकादम आयुब हबीब शेख यास धोधण्यासाठी माझा एक दिवस उलटला. मी दिनांक 09/02/2025 रोजी बीड येथे परत आल्यावर मला गावातील लोकांनी सांगितले मी शितल सदाशिव चव्हाण ही पोलीस ठाणे बीड ग्रामीण येथे तक्रार देण्यासाठी गेली आहे.

## वै.महंत रामकृष्णमहाराज यांच्यापुण्यस्मरणा निमित्त वरपगाव येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताह

**केज । प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र साधु शिवरामपुरी मठ संस्थान येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी श्री संत नागेशपुरीजी महाराज वरपगावकर यांच्या पावन स्मृतीने पवित्र झालेल्या वरपगाव च्या भूमीमध्ये वैकुंठवासीमहंत रामकृष्ण महाराज वरपगावकर यांच्या १९ व्या पुण्यस्मरणानिमित्त दि.११ फेब्रुवारी २०२५ ते दि.१८ फेब्रुवारी २०२५या कालावधीमध्ये वरपगाव तालुका केज येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजनकरण्यातआलेले आहे.सदरील अखंड हरिनाम सप्ताहामध्ये विविध सुप्रसिद्ध कीर्तनकारांच्या कीर्तनाचे आयोजन केलेले असून याचा अलभ्य लाभ सर्व भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.यावेळी अनेक नामंवत सुश्राव्य कीर्तना मध्ये दि.११ फेब्रुवारी २०२५ रोजी ह.भ.प. जगन्नाथ महाराजदेशमुख पंढरपुरकर यांचे कीर्तन होईल,दि.१२ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.बाळु महाराज गिरगावकर दि.१३ फेब्रुवारी रोजीह.भ.प. महंत श्रीराम महाराज विडेकर.दि.१४ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.हरीहर महाराज दिवेगावकर यांचे किर्तन होईल तसेच दि.१५ फेब्रुवारी रोजी ह.भ.प विठ्ठल महाराज शास्त्री तर दि.१६ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.समाधान महाराज शर्मा यांचे कीर्तन होईल. दि.१७ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.पांडुरंग महाराज क्षीरसागर यांचे किर्तन होईल तर काल्याचेकिर्तन दि.१८ फेब्रुवारी २०२५ रोजी मठाधिपती मठ संस्थान वरपगाव महंत ह.भ.प.भगवान महाराज वरपगावकर यांचे कीर्तन होईल.वरील सुप्रसिद्ध कीर्तनकार यांचा मेळा या ठिकाणी भरणार असून किर्तन हे संध्याकाळी सात ते नऊ या वेळेत होतील.तसेच अखंड हरिनाम सप्ताहामध्ये ह.भ.प.प.पु रामकृष्ण महाराज शास्त्री (काकाजी)आळंदीदेवाची याच्या सुमधुर वाणीतून दररोज श्रीमद भागवत कथेचे प्रवचन दोन ते चार वेळेत करण्यात येईल. सप्ताहाचे हे विशेष आकर्षण



म्हणता येईल. दैनंदिन कार्यक्रमांमध्ये पहाटे चार ते सहाकाकडा भजन,सहा ते सात विष्णुसहस्त्रनाम,सात ते दहा ज्ञानेश्वरी पारायण, बारा ते एक भोजन व विश्रांती,दोन ते चार श्रीमद् भागवत कथा, पाच ते सहा हरिपाठ, सात ते नऊ हरिकीर्तन अशा प्रकारे नियोजन केलेले आहे.त्याचप्रमाणे इतरही विविधकार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.प्रतिवर्षी प्रमाणे या कार्यक्रमात केज तालुक्यातील वरपगावच्या पंचक्रोशी तील शेकडो गावाच्या भाविक भक्तांचा सागर या ठिकाणी पहावयास मिळत असतो.वैकुंठवासी नागेश पुरी महाराज वरपगावकर,वैकुंठवासी रामकृष्ण महाराज यांचा आशीर्वाद घेण्यासाठी सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असेवरपगाव मठाचेमठाधिपती ह.भ.प. महंत भगवान महाराज शास्त्री वरपगावकर व वरपगाव ग्रामस्थ यांच्या

वतीने परिसरातील सर्व भाविक भक्तांना आवाहन करण्यात आले आहे. दररोज संध्याकाळी ठिक सात वाजता किर्तन सेवा सुरू होणार आहे यांचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

## आदिवासी हायस्कूल पोशेरा येथे शनिवारी दहावीचा शुभचिंतन सोहळा संपन्न

**पालघर । सौरभ कामडी**

रयत शिक्षण संस्थेच्या आदिवासी हायस्कूल पोशेरा येथे शनिवारी दहावीचा शुभचिंतन सोहळा संपन्न झाला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन मा.पांडुरंग बाळू नवले हे होते. या कार्यक्रमासाठी पोशेरा गावचे सरपंच मा.मनोहर नवले,स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य मा.देवराम पाटील , मा.रामचंद्र बदादे, मा.मच्छिंद्रनाथ बदादे,मा.कुणाल काशीद, मा.प्रभाकर शेवाळे, मा.काशिनाथ कचरे,मा.चिंतामण बदादे, मा . पंडित खादे पोशेरा केंद्र शाळेचे मुख्याध्यापक मा.मांगात सर, मा.निरगुडे सर, मा.लिलके सर हे उपस्थित होते त्याचबरोबर या कार्यक्रमासाठी केंद्रप्रमुख मा.पाटील सर यांनीही सदिच्छा भेट दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक मा.कापडणीस सर यांनी केले. त्याचबरोबर मा.मच्छिंद्र बदादे, मा.लिलके सर, मा.निरगुडे सर, मा.कुणाल काशीद, मा.जयराम वाघ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतानाच परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनीही आपली मनोगते व्यक्त केली.मा.जयराम वाघ यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना प्रथम तीन क्रमांकासाठी रोख बक्षीसे त्याचबरोबर आपल्या हॉटेल कणसरी वरती जेवणाचे निमंत्रण दिले.



या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आठवीची विद्यार्थिनी दीक्षा पाटील हीने केले.तीचे कौतुक रोख बक्षीस देऊन मा.जयराम वाघ यांनी केले.आभार प्रदर्शन वर्गशिक्षक जुनघरे सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोनवणे सर, शेख सर, .कडू मॅडम, जाधव सर . मधुकर नवले यांनी मेहनत घेतली.सर्वांना भोजनाची सोय करण्यात आलेली होती भोजन झाल्यानंतर कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली.

## विद्यार्थ्यांनो मोबाईल बघण्यापेक्षा मैदानावर जा व मनसोक्त खेळा–प्रियंका इंगळे

**केज । प्रतिनिधी**

भारतीय महिला खो–खो संघाची विश्वचषक विजेती कर्णधार कु.प्रियंका इंगळे यांनी आवाडएज्युकेशनल अकॅडमी केज च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून व छोट्याशा गावातून येवून भारतीय महिला खो खो संघाचे कर्णधारपद भूषविणाऱ्या प्रियांका यांनी या प्रसंगी बोलताना जिद्द,चिकाटी व सातत्य या त्रिसूत्री चा वापर करून यशाला गवसणी घालत येते असे सांगितले.विद्यार्थ्यांनी मोबाईल बघण्यापेक्षा मैदानावर मनसोक्त खेळावे खेळामुळे आरोग्य सुधारते व एकाग्रता वाढण्यास मदत होते असे ही सांगितले.विद्यार्थ्यांनी आहाराकडे विशेष लक्ष देण्याची सूचनाही त्यांनी या वेळी बोलताना केली. या प्रसंगी बोलताना त्यांच्या वडिलांनी दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल




सांगायला त्या विसरल्या नाहीत.एका विश्वविजेत्या कर्णधाराला ऐकण्याचा व पाहण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना वेगळाच आनंद देवून गेला.आवाड एज्युकेशन अकडमीचे संचालक डा.विठ्ठल आवाड सर यांनी आपल्या भाषणात म्हटले की,धन्यवाद प्रियंका दीदी,तुम्ही वेळात वेळ काढून आलात वआमच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनकेले त्याबद्दल तुमच्या पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या आहेत.

## भंडारा जिल्ह्यासाठी भरीव निधी देण्याचा प्रयत्न–उपमुख्यमंत्री पवार

### सौरऊर्जा, पर्यटन आणि तीर्थक्षेत्र विकासासाठी स्वतंत्र निधी देण्याचा निर्णय

**भंडारा । प्रतिनिधी**

जिल्हा नियोजन समितीद्वारे जिल्ह्यातील विकास कामांना निधी देण्यात येतो .गतवर्षीपेक्षा भंडारा जिल्ह्याला २०२५ – २६ यावर्षासाठी भरीव निधी देण्याचा शासनाचा प्रयत्न राहील असे आश्वस्त उद्गार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे काढले.ऑनलाईन बैठकीद्वारे भंडारा जिल्ह्याचा जिल्हा नियोजन समितीचा आढावा त्यांनी घेतला.



यावेळी पालकमंत्री संजय सावकारे , वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल हे ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते .तर जिल्हाधिकारी कार्यालयातून जिल्हाधिकारी डॉ.संजय कोलते, मुख्य कार्यकारी अधिकारी, समीर कुर्तकोटी व सर्व विभाग प्रमुख सभागृह परिषद कक्षात उपस्थित होते.यावेळी बोलताना पवार म्हणाले की शासकीय इमारती इमारतींचे विद्युतीकरण हे सौरऊर्जेद्वारे करण्यात यावे .या कामाला प्राधान्य देण्यात यावे. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग असेल किंवा सर्व शासकीय कार्यालय विभाग प्रमुख असतील यांनी सौर ऊर्जेवर विद्युतीकरण प्रक्रियेसाठी पुढाकार घ्यावा.भंडारा जिल्ह्यातील पर्यटन विकासासाठी व तीर्थक्षेत्र विकासासाठी देखील यंत्रणांनी या दृष्टीने विचार करून विकास आराखडा सादर करावा .जल पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी वेगळा निधी देण्याचे त्यांनी आश्वस्त केले.यावेळी ऑनलाइन पद्धतीने नागपूर विभागीय अप्पर आयुक्त कार्यालयातून डॉ.माधवी खोडे–चवरे उपस्थित होत्या.

# शिवजन्मोत्सव सोहळ्यात यावर्षी शिवशाही महानाट्याचे आयोजन–आ.विजयसिंह पंडित

**गेवराई । प्रतिनिधी**

आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली सालाबादाप्रमाणे यावर्षी राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा २०२५ चे थाटात आयोजन करण्यात येत असून यावर्षी शिवजन्मोत्सव सोहळ्यात सुप्रसिद्ध ऐतिहासिक महानाट्याचे लेखक महेंद्र महाडिक दिग्दर्शित शिवशाही या ऐतिहासिक महानाट्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी पत्रकार परिषदेत दिली. शिवजन्म शिवजन्मोत्सव सोहळ्याची माहिती देताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की २०१४ पासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन केले जाते. वर्गणी आणि डीजे मुक्त वातावरणात हा शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित केला जातो. यापूर्वी शिवगर्जना, शिवपुत्र संभाजी, राजा शिवछत्रपती या महानाट्याचे आयोजन करण्यात आले व त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित ऐतिहासिक महानाट्य शिवशाही चे आयोजन करण्यात आलेले आहे. या नाटकांमध्ये राजमाता जिजाऊ म्हणून सिनेतारका अलका कुबल, छत्रपती शिवाजी महाराज सिने कलावंत शंतनू मोघे, हंबीरराव मोहिते नाट्य अभिनेते प्रकाश धोत्रे, कागा भट्ट महेश कोकाटे, संत तुकाराम महाराज रमेश रोकडे, बाजीप्रभू देशपांडे राजेश आहेर, हे भूमिका सादर करणार असून यात २५० सहभागी कलाकार सहभागी होणार आहेत. सुप्रसिद्ध लेखक तथा नाट्यनिर्माते महेंद्र महाडिक दिग्दर्शित शिवशाही या महानट्याचे ५५ फुटाचा हायड्रोलिक सेट हे वैशिष्ट्य आहे. शिवजयंतीच्या दिनी शुभारंभाचा मुख्य शो १९ फेब्रुवारी रोजी मान्यवरांच्या उपस्थित होणार असून हा शो सर्वांसाठी विनामूल्य आणि खुला आहे. २० फेब्रुवारी रोजी फक्त महिलांसाठी तर २१ फेब्रुवारी रोजी फक्त विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला आहे. प्रेक्षकांसाठी खुर्च्याची बैठक व्यवस्था करण्यात येणार असून शिवशाही महानाट्य व शिवजन्मोत्सव सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात येत असलेल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित ऐतिहासिक महानाट्य शिवशाही साठी नाट्यमंच आणि मंडप उभारणी कामांचा भव्य शुभारंभ आज शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजक आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी भवानी बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे यांच्या हस्ते विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी

जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्रीराम आरगडे , आप्पासाहेब गव्हाणे, सुभाषराव मस्के, जालिंदर पिसाळ, नगरसेवक शाम येवले, शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, सरपंच शितल साखरे, शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष शैलेश तोष्णीवाल, सहकार्याध्यक्ष संदिप मडके, सहकार्याध्यक्ष संतोष सुतार, उपाध्यक्ष अँड मनोज हजारे, स्वप्निल मोटे, अमजद शेख, बंटी सौंदरमल, सचिव राहुल मस्के, सहसचिव शहादेव निकम, कोषाध्यक्ष पप्पू पठाण, सह कोषाध्य रणजित घुंबार्डे, कार्यकारणी सदस्य प्रभाकर भालशंकर, प्रदीप सुतार, धीरज गळगुंडे, मयूर गव्हाणे, वसीम फारोकी, सुभाष गुंजाळ, जयसिंग माने, अशोक बेद्रे, संजय दाभाडे, कमलाकर हातागळे, सादिक शेख, विशाल हुंबे, मोहसीन बागवान यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077